


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २४७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.१८ एप्रिल २०२५




## ‘मोदी- शाह’ हेच आमचे नेते : सुनिल तटकरे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, सोलापूर :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रीकरणावर प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी थेट भूमीका मांडली आहे. शिवाय आपण या पुढच्याकाळात नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली काम करणार असल्याचे ही त्यांनी स्पष्ट केले आहे. ज्यांना मोदी आणि शाह यांचे विचार पटत असतील त्यांनी आमच्या सोबत यावे असंही सांगत त्यांनी एकत्रीकरणाचा मुद्दाच निकाली काढला आहे. तटकरे हे पंढरपूरला दर्शनासाठी आले होते त्यावेळी ते पत्रकारांबरोबर बोलत होते.

यावेळी बोलताना त्यांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात, याबाबत पांडुरंगाकडे मागणे मागण्याचा विषय येत नाही. अजित पवार , प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ यांच्यासह चर्चा करून सामुदायिक निर्णय घेण्यात आला. त्यानंतर आम्ही एनडीएमध्ये गेलो असं तटकरे यांनी स्पष्ट केलं. शिवाय येत्या काळात नरेंद्र मोदी



आणि अमित शहा यांच्याच नेतृत्वात आम्ही काम करू असं ही त्यांनी ठाम पणे सांगितलं. त्यामुळे या विचारांचे जे असतील तेच आपल्या सोबत असतील, हे सांगायला ते विसरले नाही.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याची शक्यता ही त्यांनी फ`टाळून लावली. शिवाय ही चर्चा निरर्थक असल्याचे ही सुनील तटकरे म्हणाले. अमित शाह यांच्या दौऱ्यानंतर रायगड पालकमंत्री पदाचा तिढा सुटला का ? या प्रश्नावर उत्तर देताना तटकरे यांनी आपण सात्विक भावनेने विठ्ठल दर्शनासाठी आलो आहोत. मी कूपमंडन प्रवृत्तीचा नाही. त्यामुळे विठ्ठलाच्या दारी रायगड पालकमंत्रिपदाचा आपल्या मनात प्रश्न नाही.असे सांगत अद्यापही रायगड पालकमंत्री पदाचा तिढा सुटला नसल्याचे अप्रत्यक्ष संकेत तटकरे यांनी दिले आहेत.

दरम्यान गेल्या काही दिवसापासून राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येणार अशी चर्चा होती. शरद पवारांना आजही आपले दैवत मानतो असे वक्तव्य तर अजित पवारांनीच केले होते. त्यानंतर या चर्चेला आणखी बळ मिळालं. मात्र प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी या चर्चेतील हवाच काढली. शिवाय आपण मोदी शाह यांच्याच नेतृत्वाखाली काम करणार असल्याचं स्पष्ट करताना, शरद पवारांचे नेतृत्व एक प्रकारे फेटाळून लावले आहे. शिवाय जर मोदी शाह यांचे विचार पटत असतील तेच आमच्या सोबत असतील अशी अट टाकत त्यांनी शरद पवार गटाचीही कोंडी केल्याची चर्चा आहे.

## थोडक्यात

### रस्ते दुरूस्त करा अन्यथा एसटी बस सेवा विसरा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, अकोला :** गाव तिथे एसटी हे समिकरण अनेक वर्षापासून आहे. गावागावांना जोडणार दुवा म्हणजे एसटी बस. मात्र ज्या गावांमध्ये ही एसटी जाते त्या गावात जाणाऱ्या रस्त्यांची स्थिती सध्या अतिशय वाईट आहे. तरही विद्यार्थी गावकरी यांची गैरसोय होवू नये म्हणून एसटी प्रशासनाकडून बस गावापर्यंत सोडली जाते. पण आता तसं होणार नाही. गावात जाणारा रस्ता चांगला नसेल तर त्या गावात जाणाऱ्या बसच्या फेऱ्या रद्द करण्यात येतील. असं पत्रच संबंधीत गावच्या संरपंचाना धाडण्यात आलं आहे. या पत्राने एकच खळबळ उडाली आहे.

हा प्रकार घडला आहे अकोला जिल्ह्यात. अकोल्यातल्या धामणा आणि बोरगाव वैराळे ग्रामपंचायतला अकोला एसटी आगाराने पत्र दिले आहे. त्या द्वारे गावात येणाऱ्या एसटी बस फेऱ्या रद्द करण्याचं कळवण्यात आलं आहे. अकोल्यातल्या धामणा ते हातरून हा १० किमीचा रस्ता पूर्ण पणे खड्ड्यात आहे. त्यामुळे बसचं ही नुकसान होतं. शिवाय अशा रस्त्यावरून प्रवास करणं हे धोक्याचं ही आहे. अपघाताची शक्यता वाढली आहे. त्यामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात टाकल्या सारखं आहे. त्यामुळेच अकोला 'एसटी डेपो'नं मोठं पाऊल उचललं आहे.

नरेश खंडारे हे अकोल्याचे मध्यवर्ती बस व्यवस्थापक प्रमुख आहेत. त्यांनी सांगितले की अकोल्यातल्या 'धामणा' आणि 'बोरगाव वैराळे' या गावांचा रस्ता खराब आणि खड्डेमय झाला आहे. याबाबत चालकांनीही तक्रारी केल्या आहेत. त्यामुळे या गावातील बससेवा बंद होण्याची शक्यता आहे असं ते म्हणाले. या दोन्ही ग्रामपंचायतींना याबाबत पत्र लिहीले असल्याचं त्यांनी सांगितलं. गावचे मुख्य रस्ते दुरुस्त करा, अन्यथा बस फेऱ्या रद्द करू, असं पत्राद्वारे ग्रामपंचायतीला कळवण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

## कळंबकर करीत आहेत जारच्या पाण्याने अंघोळ !

### नगर परिषद करते तरी काय? सोशल मीडियावर नागरिकांचा प्रश्नांचा भडीमार

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.१७, कळंब :** कळंबकर करत आहेत, जारच्या पाण्याने आंघोळ, नेम की नगर परिषद करते तरी काय? असा प्रश्न सोशल मीडियावर नागरिक विचारू लागले आहेत, आंदालन, निवेदन हा काही पर्याय नाही. सगळेच विकत पाणी घेऊ शकत नाहीत, त्यामुळे प्रशासनाने याची दखल घेणे गरजेचे आहे.

कळंब येथील मराठा सेवा संघाचे शहर अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक संदीप शेडगे सर यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट केली असून, त्यात आंबेडकर जयंतीनिमित्त घरी मुक्कामाला थांबलो होतो. सकाळी लवकर शाळेला जायचं होत, नळाला आलेलं पाणी अंघोळ करण्याच्या लायकीच नव्हतं, दोन जार मागवले अंघोळ करून निघून गेलो.

मांजरा नदीकाठी बुड्या घेणारे आम्ही शेतकरी. कळंब नगर परिषदची अडचण असेल अस समजून घेतल असत...पण नेमके प्रशासन करते तरी काय असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला आहे. या पूर्वी जिजाऊ रथयात्रा निमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा/चौक भोवती स्वच्छता अपेक्षित होती,केली गेली नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती दिवशी स्वच्छता अपेक्षेप्रमाणे झाली नाही, प्रत्येकवेळी, प्रत्येक विषयात निवेदन आणि आंदोलन हाच पर्याय




नसतो. काही गोष्टी न. प. ने कराव्या लागतात, पण तसे होताना दिसत नाही. प्रशासक आणि नगरपालिका प्रशासनाचे सर्व विभागप्रमुख यांच्यासाठी आता आम्ही काय करावे असा प्रश्न ही संदीप शेंडगे सर यांनी विचारला आहे, पाणी साठा भरपूर असताना ही नगर परिषदच्या दुर्लक्ष मुळे, सर्वसामान्य जनतेचे हाल होत आहेत. स्वच्छतेकडे ही कुणाचे लक्ष नाही. जागोजागी कचऱ्याचे ढीग पडलेले आहेत. सर्व विभागप्रमुख व प्रशासक महिला असल्याने कुणाला काय बालावे, हे कळत नसल्याची प्रतिक्रिया नागरिक देत आहेत.

## साधूच्या वेशात फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश




**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१७, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली पूर्व येथील वेटलॅन्ड पार्कजवळ एका ज्येष्ठ नागरिकाला साधूच्या वेशातील व्यक्तीने हातचलाखीने फसवून त्याच्याकडून सोन्याचे दागिने हिसकावल्याची घटना घडली. या घटनेतील तिन्ही आरोपींना मानपाडा पोलिसांनी केवळ २४ तासांत शिताफीने अटक करून गुन्हा उघडकीस आणला आहे.

ही घटना दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी सुमारास घडली. फिर्यादी माधव दिवाकर जोशी (वय ७५) हे भाजी खरेदी करून आपल्या राहत्या घरी जात असताना, एका पांढऱ्या रंगाच्या कारमधून आलेल्या तीन अनोळखी इसमांनी त्यांना थांबवले. त्यापैकी एकाने साधूचा वेश धारण केला होता व स्वतःला साधू असल्याचे भासवून जोशी यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर हातचलाखीने त्यांच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन आणि १० ग्रॅमची अंगठी असा एकूण १.२० लाख रुपये किमतीचा ऐवज लंपास केला.

फिर्यादीने तत्काळ मानपाडा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, पोलिसांनी तांत्रिक तपासाद्वारे गुन्ह्यात वापरलेली कार (चक ०३ उक ३९३२) शोधून काढली आणि आरोपींची ओळख पटवली.

**अटक करण्यात आलेले आरोपी पुढीलप्रमाणे आहेत :**

१. राहुल धालनाथ भाटी उर्फ मदारी (वय २९), रा. गणेशपुरा, भरवाळ नगर, जि. गांधीनगर, गुजरात

२. आशिष दिलीपनाथ मदारी (वय २०), रा. अराधा रोड, जि. पंचमहाल, गुजरात

३. लखन आबा निकम (वय ३४), रा. आडेगाव, जि. सोलापूर, सध्या रा. वाघोली, पुणे

त्यांच्याकडून चोरीस गेलेली सोन्याची चैन व गुन्ह्यासाठी वापरलेली कार जप्त करण्यात आली आहे.

ही यशस्वी कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त संजय जाधव, पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त. सुहास हेमाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. ही कारवाई पोलीस निरीक्षक . राम चोपडे यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

या पथकामध्ये दत्तात्रय गुंड, जयपाल गिरासे, महेश राळेभात, संपत फडोळ, सागर चव्हाण, राजेंद्रकुमार खिलारे, सचिन साळवी, सुनिल पवार, शिरीष पाटील, संजु मासाळ, विकास माळी, सुशांत पाटील, गणेश भोईर, कृष्णा बोराडे, यल्लपा पाटील, घनश्याम ठाकुर, गणेश बडे, नाना चव्हाण, विजय आव्हाड, अशोक आहेर, सोपान शेळके, योगेश आहे यांचा मोलाचा सहभाग होता.

मानपाडा पोलिसांच्या या तत्पर आणि कुशल कारवाईमुळे डोंबिवलीतील नागरिकांमध्ये पुन्हा एकदा पोलिसांप्रती विश्वास वाढला आहे.

## क्रांतीची रोप रुजविण्याचे काम बौध्द विहारातून व्हावे : आ. विजय वडेट्टीवार



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, चंद्रपूर :** मनुवादी विचारसरणीच्या लोकांकडून लोकशाहीवर घाला घालण्याच काम सुरू झाले आहे. मात्र भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेलं संविधान हे बहुजनांसाठी कवच आहे. आपल्या सर्वांना माणुस म्हणून जगण्याचा हक्क, अधिकार बाबासाहेबांनी मिळवून दिला आहे. मनुवादी विचारसरणीला सडेतोड उत्तर देण्यासाठी क्रांतीची रोप रुजविण्याचे काम बौध्द विहारातून व्हावे, असे प्रतिपादन ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले. ते ब्रम्हपूरी तालुक्यातील रामपुरी येथे आयोजित आनंद बुध्दविहार लोकार्पण सोहळ्याप्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते.

याप्रसंगी मंचावर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ.राजेश कांबळे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमुरकर, माजी पंचायत समिती सदस्य थानेश्वर कायरकर, पत्रकार संघाचे अध्यक्ष विजय रामटेके, शहर काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष सुधाकर पोपटे, पं.स.तांत्रिक अधिकारी रंजित कसारे, चिचखेडा सरपंच संजना घुटके, युवक काँग्रेसचे विधानसभा उपाध्यक्ष अमित कन्नाके, अनुसूचित जाती सेलचे विधानसभा अध्यक्ष प्रकाश खोब्रागडे, पोलिस पाटील इंदिरा तुपट यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले की, आज आपण आपल्या आयुष्यात सोन्याचे दिवस फक्त बाबासाहेबांच्या पुण्याईमुळेच बघत आहोत. त्यामुळे पुस्तके वाचा. बुध्द विहारात वाचनालय तयार करून त्या वाचनालयातुन अधिकारी घडले पाहिजे. मी पुरोगामी विचारांचा माणूस असुन बाबासाहेबांचा अनुयायी आहे. त्यामुळे समाजातील शेवटच्या घटक असलेल्या माणसाचा सर्वतोपरी विकास व्हावा, यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहतो असेही ते म्हणाले. सोबतच बुध्द विहार हे संस्कार केंद्र व्हावे यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे आवाहन करीत विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नेपाल मोटघरे यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते.

**विविध बौद्ध विहारांना दिल्या भेटी**

आमदार विजय वडेट्टीवार यांनी तालुक्यातील जुगनाळा, मुडझा व शहरातील शिवाजी महाराज चौक, गुजरी वार्ड, धम्मभुमी याठिकाणी जाऊन बाबासाहेबांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करीत भीम जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

# संपादकीय



## मान्सूनचा सुखद सांगावा

मागील काही वर्षात दुष्काळाने पिचलेल्या महाराष्ट्राला भारतीय हवामान खात्याने सुखद धक्का दिला आहे. भारतीय हवामान खात्याने यावर्षी पडणाऱ्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे. हा अंदाज बळीराजासाठी सुखावणारा आहे. कारण यावर्षी सरासरीपेक्षा अधिक ( १०५ ) टक्के इतका पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. या अंदाजात पाच टक्के कमी अधिक तफावतीची शक्यता गृहीत धरण्यात आली आहे याचाच अर्थ यावर्षी १०० ते ११० टक्के पावसाची शक्यता आहे. देशाच्या उत्तर आणि ईशान्य भागात तसेच महाराष्ट्रासह दक्षिण भागातही सरासरी इतका किंवा सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रावर वरुण राजाची कृपा राहणार असून कायम दुष्काळग्रस्त असणाऱ्या मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातही पावसाचे प्रमाण अधिक असण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हवामान खात्याच्या या अंदाजाने राज्यातील बळीराजा सुखावला आहे. हा अंदाज बळीराजासाठी जितका सुखावणारा आहे तितकाच तो उद्योग जगतासाठीही सुखावणारा आहे. कारण कोरोनामुळे उद्योग जगताची घसरलेली गाडी अजूनही सावरलेली नाही. त्यात मागील दोन वर्ष राज्यावर दुष्काळाचे सावट होते. मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळसदृश परिस्थिती होती त्याचा उद्योग जगतावर देखील मोठा परिणाम झाला आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारताची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवरच अवलंबून आहे. शेती हाच भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही देशाची ६० टक्के लोकसंख्या ही शेतीवरच अवलंबून आहे. त्यामुळे तिच्या स्थैर्यासाठी आणि विकासासाठी शेतीचे विशेष महत्व आहे. मागील काही वर्ष देशात दुष्काळ पडला होता. त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला होता. कोरोनामुळे देशातील अनेक उद्योग ठप्प पडले होते त्यामुळे देशाचा जिडीपी ही घसरला होता अशावेळी शेती क्षेत्राने देशाला वाचवले होते. कोरोना गेल्यानंतर सर्व काही सुरळीत होईल अशी अपेक्षा असतानाच मागील दोन वर्ष देशात आणि राज्यातील काही भागात भीषण दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली होती. या वर्षी राज्यात समाधानकारक पाऊस पडला असला तरी राज्यातील काही भागात दुष्काळसदृशच परिस्थिती होती. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे राज्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. राज्यातील पाणी साठा संपत आला आहे. नद्या कोरड्या पडल्या आहेत. धरणे आटली आहे. बोअरवेलला पाणी लागत नाही. नागरिकांना वापरण्यासाठी सोडा पण पिण्यासाठी देखील पाणी मिळत नाही. एका एका हंड्यासाठी नागरिकांना कैक किलोमिटरची पायपीट करावी लागत आहे. शहरातही काही भागात टँकर चालू आहे. राज्यातील काही भागात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतीलाही पाणी मिळणे मुश्कील झाले आहे. अशावेळी सर्वांच्या नजरा हवामान खात्याच्या अंदाजाकडे लागल्या होत्या. सुदैवाने हवामान खात्याचा सुखद अंदाज आल्याने राज्यातील दुष्काळग्रस्त नागरिकांना सुखद धक्का बसला आहे. यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस होणार असल्याने भरघोस पीक येऊन रान आबादानी होणार आहे. शिवाय राज्यातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मिटणार आहे. जर हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार पाऊस झाला तर उद्योग जगतावर ही त्याचा सकारात्मक परिणाम होईल. एकूणच हवामान खात्याने वर्तवलेला मान्सूनचा हा सुखद अंदाज सर्वांनाच सुखावणारा आहे.

# सोशल मीडियावरही आयपीएलचा फिव्हर !

आयपीएल अर्थात इंडियन प्रीमियर लीगचे हे अठरावं वर्ष आहे. सलग अठरा वर्ष आपली लोकप्रियता टिकवून ठेवणारी आयपीएल ही जगातील एकमेव क्रिकेट लीग आहे. गेली अठरा वर्ष केवळ भारतातीलच नाही तर जगातील सर्वाधिक लोकप्रिय क्रिकेट लीग म्हणून आयपीएलकडे पाहिले जाते. जगभरातील अनेक दिग्गज खेळाडू या लीगमध्ये सहभागी होतात. मुळातच क्रिकेटला एका धर्माप्रमाणे स्थान असलेल्या भारतामध्ये आयपीएल सुरू असल्याने सहभागी संघाचे फॅन फॉलोअर्सची संख्या देखील खूप मोठी आहे. आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी फॅन मैदानावर गर्दी करताना दिसतात. आयपीएलचा सामना कोणत्याही मैदानावर, कोणत्याही शहरांमध्ये असो क्रिकेट रसिकांच्या उदंड प्रतिसादामुळे मैदाने तुडुंब भरली असल्याचे चित्र आपण दरवर्षीच पाहतो मात्र यावर्षी मैदानासोबतच मैदानाबाहेरही आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी चाहत्यांमध्ये स्पर्धा लागली आहे. आजचे युग सोशल मीडियाचे युग आहे. सोशल मीडियाचा वापर न करणारा क्रिकेट चाहता शोधूनही सापडणार नाही. आयपीएलमध्ये सहभागी असणाऱ्या सर्वच्या सर्व म्हणजे दहाच्या दहा संघाचे स्वतंत्र ट्विटर ( एक्स ) अकाउंटस आहेत. प्रत्येक संघाला ट्विटरवर ( एक्स ) फॉलो करणारे लाखो फॉलोअर्स आहेत. हे फॉलोअर्स ट्विटर वरून आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करत असतात. आयपीएलची मॅच चालू असताना ट्विट्स चा अक्षरशः पाऊस पडतो. सेकंदाला हजारो ट्विट्स येत असतात. जो तो आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी ट्विट करत असतात. या सर्वांमध्ये मुंबई इंडियन्स आणि रॉयल बंगळुरू चॅलेंज या



संघांचे फॅन फॉलोअर्स सर्वात जास्त आहेत. ट्विटर प्रमाणेच व्हाट्सएप, फेसबुक, इन्स्टाग्रामवर देखील चाहते आपल्या संघाला सपोर्ट करीत असतात. आपल्या आवडत्या संघाची मॅच असेल तर चाहते आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी व्हाट्सएपवर स्टेटस ठेवतात. सध्या सोशल मीडियाचं चित्र पाहिलं तर मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपर किंग व रॉयल चेलेंजर्स बंगळुरू या तीन संघांना सोशल मीडियावर चाहत्यांचा सर्वात जास्त सपोर्ट मिळताना दिसत आहे. खेळाडूंमध्ये सर्वात जास्त सपोर्ट रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या विराट कोहली याला मिळत आहे. टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला तरी विराट कोहलीची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे हे सोशल मीडियावरून लक्षात येते. दूरचित्रवाणीवर तर प्रेक्षक सामने पाहतच असतात पण ज्यांना दूरचित्रवाणीवर सामना पाहणे शक्य होत नाही ते मोबाईलवर सामना पाहतात. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा सामना कोणत्याही संघासोबत असला तरी प्रेक्षक त्यांचा सामना आवर्जून पाहतात. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना जिओ टीव्ही वर सर्वात जास्त पाहिला जातो. करोडो प्रेक्षक जिओ टीव्हीवर सामने पाहतात. प्रत्येक सामन्याला करोडो प्रेक्षक मिळतात हा एक विश्वविक्रमच आहे. फेसबुक, व्हाट्सएपवर मॅच कोण जिंकणार याबद्दल चाहत्यांमध्ये पैजा लागत आहे. मॅच संपल्यानंतर मॅचवर आधारित तसेच प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खिल्ली उडवणाऱ्या मजेशीर मिम्स बनवून व्हायरल केल्या जात आहे. हे मिम्स बोलके असतात. यातून करमणूक तर होतेच पण संघाची सद्यस्थिती काय आहे हे देखील समजते. गुजरात टायटन संघाचा मुख्य प्रशिक्षक आशिष नेहरा खेळाडूंना सतत काही ना काही सल्ले देत असतो. ड्रिंक्स ब्रेक मध्ये तर तो कर्णधार आणि खेळाडूंना सल्ला देत असतोच पण सामना चालू असतानाही तो खेळाडूंचे डोके खात असतो. वेडावाकडा चेहरा करून हातवारे करत तो खेळाडूंचे डोके खात असतो त्यामुळे त्याची खिल्ली उडवणारे अनेक मिम्स सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहेत. चेन्नई आणि मुंबई संघ सध्या पराभवाच्या गर्तेत सापडले आहेत. सलग पाच सामन्यात पराभव झाल्याने चेन्नई संघ नेटिझन्सच्या निशाण्यावर आला असून या संघाची सोशल मीडियावर चांगलीच खेचली जात आहे. तीच गत मुंबईची आहे. मुंबईचाही सलग चार सामन्यात पराभव झाला आहे. त्यामुळे या दोन्ही संघांना सोशल मीडियावर टार्गेट केले जात आहे. या दोन्ही संघाचे आधारस्तंभ असलेले धोनी आणि रोहित शर्मा हे देखील आपल्या लौकिकाला साजेशी कामगिरी करत नसल्याने त्यांची देखील सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात खिल्ली उडवली जात आहे. प्रतिस्पर्धी संघाची आणि संघातील खेळाडूंची मजेशीर मिम्स आणि बनवून आणि मेसेज करून खिल्ली उडवतानाच नेटकरी आपल्या आवडत्या संघाला मात्र भरघोस पाठिंबा देत आहेत. आपल्या आवडत्या संघाला भरघोस पाठिंबा देतानाच प्रतिस्पर्धी संघाची खिल्ली उडवून फॅन आयपीएलचा फिव्हर आणखी वाढवत आहे. एकूणच केवळ मैदानावरच नव्हे सोशल मीडियावर देखील आयपीएलचा फिव्हर वाढल्याचे दिसून येत आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# कल्याण-डोंबिवली महापालिकेला 'हरित-महासिटी कंपोस्ट' ब्रँडची मान्यता

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१७, कल्याण (ठाणे) :** स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला शासनातर्फे हरित-महासिटी कंपोस्ट या अधिकृत ब्रँडचा वापर करण्यास परवानगी मिळाली आहे. या उपक्रमामुळे महानगरपालिकेला त्यांच्या कचरा व्यवस्थापन प्रकल्पांमधून तयार होणाऱ्या सेंद्रिय खताचे विपणन व विक्री करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महानगरपालिका क्षेत्रात दररोज सुमारे ८०० ते १००० टन कचरा निर्माण होतो. यापैकी ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी मौजे उंबर्डे, कल्याण पश्चिम येथे ३५० टीपीडी आणि मोठागाव, डोंबिवली येथे १०० टीपीडी क्षमतेचे




प्रकल्प कार्यरत आहेत. या ठिकाणी सेंद्रिय खताची निर्मिती केली जात असून, याचे नमुने तपासणीसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे पाठविण्यात आले होते. प्रयोगशाळेच्या तपासणीनुसार हे खत वापरण्यास योग्य असल्याचे प्रमाणित झाले आहे. त्यानंतर महानगरपालिकेने महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र संचालनालयाकडे हरित-महासिटी कंपोस्ट या ब्रँडचा वापर करण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाची छाननी करून, FCO मानकांनुसार खत पात्र ठरल्याने एक वर्षासाठी KDMC ला अधिकृत ब्रँड वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे. या मान्यतेमुळे महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता असून, परिसरातील शेतकरी आणि नागरिकांनाही दर्जेदार सेंद्रिय खत उपलब्ध होणार आहे. हा उपक्रम शाश्वत पर्यावरणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा हा उपक्रम इतर शहरांसाठीही एक प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## गुड फ्रायडे...

दुःखाचा असे सण
दिवस गुड फ्रायडे
येशू ख्रिस्तबलिदान
हा खरेतरी क्राय डे

शुभेच्छा एक दुजा
का देतो आम्ही वेडे
घंटानाद होत नाही
वेदना मनाला छेडे

रोमनराज्यकर्त्यांनी
भोवती घातले कडे
चढविले क्रूसवरती
अक्कल उघडी पडे

निर्दयते ठोकू लागे
खिळे ते सगळीकडे
काटेरीमुकुट डोक्या
रक्ताचे वाहती सडे

माफ कर मारेक-या
येशू मागे ईश्वराकडे
जाताना सात्विकते
दिले माणूसकी धडे

येतो तिस-यादिवशी
शुभ दिन ईस्टर संडे
परत येई येशू ख्रिस्त
अनुयायी स्नेह जडे

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

## माणुसकीचा अंत झाला तर....

माणुसकीचा अंत झाला तर
माणसाचा व्यवहार होईल रानटी पशुप्रमाणे.....
हे जग युध्दाच्या दिशेने जाईल आणि
माणसाचा अंत होईल क्रमाक्रमाने....

या जगात सर्वश्रेष्ठ आहे माणुसकी
ती जर नसेल माणसाच्या अंगी ....
तर मग माणूस आहे लबाड आणि ढोंगी....

बांधवांनो माणुसकीला जिवापाड जपा कारण
ती आहे बावनकशी सोन्यासारखी स्वच्छ
ज्याच्या अंगी नाही माणुसकी त्याला समजावे तुच्छ....

इथे धर्मापेक्षा व जातीपेक्षा माणुसकी महत्त्वाची
ज्याला मनापासून माणुसकी धर्म कळाला खरा...
तोच माणूस आहे या पृथ्वीतलावर बरा....

पण हल्ली माणुसकी जात आहे लयास
माणुसकी वाचवणे सध्या काळाची गरज....
माणसा वाचव स्वतःतील माणुसकी नाहीतर मरच....

आता इथे ओशाळत आहे माणुसकी
आणि सांगत आहे लोकांना माणसासारखे वागावे माणसांनी...
माझा अंत केला आहे लोकांनी व मला शिल्लक ठेवले नावांनी...

आता माणुसकी संपुष्टात येत आहे गावागावातून
सुरुवात करा माणुसकी पेरायला स्वतःच्या घरातून....
माणुसकीचा अंत झाला तर जग जाईल विनाशी उंबरठ्यातून...

**कवी- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मु.पो.खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# डॉ.दिनानाथ लोणारे यांना एम.बी.बी.एस.पदवी प्राप्त

**अक्षराज : प्रभाकर हजारे**




**दि.१७, मुंबई :** अतिशय मेहनतीने आणि जिद्दीने प्रयत्नांची पराकाष्ठा करून आपले आणि आपल्या आईवडीलांचे नावलौकिक केलेल्या डॉ.दिनानाथ दत्ता लोणारे यांना जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पदवीदान कार्यक्रमातुन एम.बी.बी.एस.ही वैद्यकीय क्षेत्रातील पदवी प्रदान करण्यात आली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागात शारीरिक शिक्षण शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या दत्ता लोणारे या अतिशय इमानदार आणि कार्यक्षम शिक्षकाचा मुलगा डॉ. दिनानाथने सन २०१९ मध्ये NEET ची परीक्षा उत्तीर्ण होऊन एम.बी.बी.एस.साठी जळगावच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला होता.एम बी बी एस च्या पहिल्या वर्षापासून दीनानाथने कसून अभ्यास सुरू केला. पदवी पूर्ण होईपर्यंत कधीच अभ्यासात कमी पडला नाही.अभ्यासात सातत्य राखल्याने आपला वैद्यकीय पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला आणि पुढे तिथेच इंटरशिप पण केली. जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नुकत्याच संपन्न झालेल्या पदवीदान समारंभात डॉ. दीनानाथ लोणारे यांना मान्यवरांच्या शुभहस्ते पदवीप्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.यावेळी डॉ.लोणारे यांचे आईवडील स्वतः या कार्यक्रमात उपस्थित होते. आपल्या मुलाच्या अतुलनीय आणि यशस्वी कामगिरीमुळे आईवडीलांना खूप आनंद झाल्याचे सांगितले.

डॉ.दिनानाथ एम बी बी एस करूनच थांबणार नाही तर पुढील एम डी पदवी पर्यंत शिक्षण घेऊन समाजातल्या गरजवंताना वैद्यकीय सेवेच्या माध्यमातून मदत करणार असल्याचे डॉ. दीनानाथ लोणारे यांनी सांगितले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## प्रवीण गेडाम यांना शिक्षणशास्त्र विषयातील आचार्य (पीएच.डी.) पदवी प्रदान



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१७, नागपूर :** कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक च्या तेराव्या दीक्षांत समारंभात भारत सरकारच्या उच्च शिक्षण विभागाच्या भाषा शिक्षण समितीचे अध्यक्ष चमू कृष्ण शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ.हरेराम त्रिपाठी, शिक्षक आमदार सुधाकर अडबाले व विद्यापीठाच्या इतर विभागाचे विभाग प्रमुख यांच्या उपस्थितीत प्रवीण गेडाम यांना विद्यावारीधी (पीएच.डी) पदवी प्रदान करण्यात आली.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या शिक्षणशास्त्र विभागाचे प्रमुख व सहयोगी प्राध्यापक डॉ.ऋषिकेश दलाई यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवीण गेडाम यांनी विदर्भातील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी व पालक यांचा व्यावसायिक मार्गदर्शन व समुपदेशन या प्रती असलेल्या दृष्टिकोनाचा अभ्यास या विषयावरील आपले संशोधन कार्य पूर्ण केले. विश्वविद्यालयाने त्यांना शिक्षणशास्त्र विद्याशाखा अंतर्गत आचार्य (पीएच.डी.) पदवी प्रदान केली.

## भवानी मंदिराच्या कलशा रोहण कार्यक्रमाच्या नियोजनाची बैठक



**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.१६, पानगाव (लातुर) :** येथे प्रसिद्ध जागृत भवानी माता मंदिर आहे. काळाच्या ओघा मध्ये मंदिराची पडझड झाली होती गावकऱ्या च्या पुढाकार तुन मंदिराच्या जीर्णोद्धार झाला मंदिर बांधले गेले. मंदिर बांधल्या नंतर मंदिरा ला कळस असणे हे गरजेचे असते.म्हणूनच गावकारी व मंदिर कमिटी कढून मंदिरा वर कळस बसवण्याचे ठरवण्यात आले.

त्या मंदिराच्या कलशा रोहनाचा कार्यक्रम शुक्रवार दि २५ एप्रिल पासून सुरु होणार आहे. या कार्यक्रम च्या संदर्भात आज बुधवार १६ एप्रिल रोजी संध्याकाळी ६ वाजता भवानी माता मंदिर पानगाव या ठिकाणी नियोजन बैठक पार पडली. शुक्रवार २५ एप्रिल ते ५ मे सोमवार पर्यत ७ दिवस ह.भ.प अनिल महाराज धर्माधिकारी याची भागवत कथा रोज दुपारी २ते ५ होणार आहे. त्या नंतर महाप्रसाद वाटप होणार आहे.

या ७ दिवसासात होणाऱ्या कार्यक्रमाच्या कामा साठी विविध नियोजन कमिट्या या वेळी स्थापना करण्यात आल्या. स्वच्छता विभाग, स्वागत समारंभ विभाग, पाणी नियोजन विभाग, स्वयंपाक विभाग आशा विविध काम पाहणाऱ्या कमिटी या स्थापना केल्या. या वेळी गावातील प्रतिष्ठत नागरिक पत्रकार व गावातील भविक भक्त मोठया संख्येने उपस्थित होते.

## घरकुल बांधकामाच्या अनुदानात वाढ !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, चंद्रपूर :** सर्वांसाठी घरे या केंद्र सरकारच्या योजनेतून घरकुलाच्या लाभार्थ्यांना केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून मिळणारे अनुदान अत्यल्प असल्याचे खासदार धानोरकर यांनी आमदार असताना तसेच, लोकसभेत देखील मत व्यक्त केले होते. घरकुलाच्या अनुदानात वाढ करण्याची मागणी त्यांनी विधानसभा तथा लोकसभेत केली होती. घरकुल अनुदानाच्या निधी वाढी संदर्भात त्यांच्या मागणीला यश प्राप्त झाले असून महाराष्ट्र राज्याच्या ग्राम विकास मंत्रालयाने या संदर्भात ०४ एप्रिल रोजी शासन निर्णय प्रसिध्द करुन समोरील टप्प्यातील घरकुलांना ५० हजार रुपये वाढीव निधी मंजूर केला आहे. या पैकी ३५ हजार रुपये बांधकामाकरीता तर १५ हजार रुपये हे सौर ऊर्जा यंत्र उभारणी करीता प्राप्त होणार आहे. खासदार धानोरकर यांनी या संदर्भात केंद्र व राज्य सरकारचे आभार मानले असून परंतू सध्याची महागाई बघता ५ लक्ष रुपये एवढे अनुदान द्यावे असे देखील मत व्यक्त केले. भविष्यात या संदर्भात आपली मागणी रेटून धरण्याचे देखील सांगितले. खासदार धानोरकर यांच्या मागणीला यश मिळाले आहे.

## कल्याणला फिरत्या ट्रॅफिक सिग्नलचा अनोखा प्रयोग



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१७, कल्याण (ठाणे) :** कल्याण शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीला सामोरे जाण्यासाठी कल्याण-डोंबिवली म हापालिका आणि वाहतूक विभागाने एक अभिनव पाऊल उचलले आहे. शहरातील सर्वात वर्दळीचा चौकात फिरत्या ट्रॅफिक सिग्नल यंत्रणेचा प्रयोग नुकताच करण्यात आला असून नागरिकांत आणि वाहनचालकांत याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. या सिग्नल यंत्रणेची खासियत म्हणजे ती वेळोवेळी वाहतुकीचा वेग, दाटी आणि दिशेनुसार आपली सिग्नल पद्धती आपोआप बदलते. त्यामुळे एखाद्या बाजूला जास्त वाहनांचा मारा असेल, तर त्या दिशेतील सिग्नल अधिक वेळ हिरवा राहतो, ज्यामुळे वाहतूक सुरळीत होते. महिन्याभर चाललेल्या परीक्षण, निरीक्षण आणि ट्रॅफिकचे विश्लेषण केल्यानंतर या प्रणालीचा प्रभावीपणा सिद्ध झाला आहे. त्यामुळे प्रशासनाने येत्या काही आठवड्यांत कायमस्वरूपी फिरता सिग्नल सिस्टीम बसवण्याचा निर्णय घेतला आहे. हा प्रयोग यशस्वी ठरल्यास, कल्याणमधील प्रमुख चौकांमध्येही ही सिस्टीम राबवली जाणार आहे. नागरिकांच्या सहकार्याने वाहतूक सुरळीत होईल, अशी अपेक्षा आहे. नागरिकांकडून या निर्णयाचे स्वागत होत असून अनेक जणांनी सोशल मीडियावर या उपक्रमाचे कौतुक केले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करणारा हा उपक्रम इतर शहरांसाठीही दिशादर्शक ठरू शकतो.

# 'मेट्रो मार्ग ७ अ' मधील भुयारी बोगद्याचे 'ब्रेक थ्रू' यशस्वीरित्या पूर्ण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, मुंबई :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (टी २) ते अंधेरी पूर्व या मेट्रो मार्ग ७ अ मधील १.६५ किलोमिटर लांबीच्या भुयारी बोगद्याचे ' ब्रेक थ्रू ' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले. यावेळी कौशल,रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार पराग अळवणी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी, अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीला संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रकल्पाविषयी माहिती जाणून घेतली. तसेच कळ दाबून 'ब्रेक थ्रू' कामाला सुरुवात केली. यानंतर या कामाची पाहणी केली. हा भुयारी बोगदा मेट्रो ७ अ वर डाऊनलाईन वर आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ स्टेशन ते एअरपोर्ट कॉलनी स्टेशन दरम्यान हा बोगदा असणार आहे. ही



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती

मेट्रो जोडणे मुंबई महानगर प्रदेशातील एकूण मेट्रो जाळ्यासाठी महत्त्वाचा टप्पा असणार आहे. या मेट्रो मार्गामुळे मुंबई महानगर क्षेत्रातील मीरा-भाईंदर व पुढे वसई - विरार हा भाग छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळासोबत मेट्रोने जोडले जातील. तसेच ठाणे व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुद्धा मेट्रो ने जोडण्यात येईल. या मेट्रो मार्गाचे ५९ टक्के काम पूर्ण झाले आहे.

**मेट्रो मार्ग ७ अ विषयी..**

या मेट्रो मार्गाची लांबी ३.४ किलोमीटर असून त्यापैकी उन्नत मार्ग ०.९४ किलोमीटर आणि भूमिगत २.५० किलोमीटर आहे. या मार्गावर दोन स्थानके असणार आहेत. एक स्थानक उन्नत मार्गावर एअरपोर्ट कॉलनी तर दुसरे स्थानक भूमिगत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे असणार आहे.

उन्नत मेट्रो मार्ग ०.५७ किलोमीटर असेल दुहेरी बोगद्याची लांबी २.०३५ किलोमीटर आहे. १ सप्टेंबर २०२३ रोजी डाउनलाईन बोगद्याचे पहिले ड्राईव्ह सुरू झाले. या बोगद्याची लांबी १.६५ किलोमीटर असून लाइनिंगसाठी ११८० रिंग्स बसविण्यात आल्या आहेत. बोगद्याचा व्यास ६.३५ मीटर एवढा असून सहा भागात विशेष डिझाईन असलेल्या प्रिकास्ट रिंग वापरण्यात आल्या आहेत.

सप्टेंबर २०२३ मध्ये टीबीएम मशीन जमिनीपासून ३० मीटर खाली भूगर्भात उतरवण्यात आली. मेट्रो मार्ग तीनच्या वरून, सहार उन्नत रस्त्याच्या पायाखालून, मोठ्या सांडपाणी वाहिन्या व जलवाहिन्यांना क्रॉस करून विविध अडचणींवर मात करून या बोगद्याचा ब्रेक थ्रू पूर्ण करण्यात आला. या मेट्रो मार्गामुळे मुंबईकरांना कुलाबा ते वसई विरार, मीरा भाईंदर पर्यंत आरामदायी प्रवास अनुभवता येणार आहे.

या मार्गामुळे मुंबई महानगर प्रदेशातील विविध मेट्रोमार्ग थेट विम नतळापर्यंत मेट्रोने जोडले जातील. मेट्रोमार्ग ३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) च्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ या भूमिगत स्थानक म र्गासोबत सुलभ संलग्न करणे शक्य होईल. प्रवाशांसाठी सुरक्षित आराम दायी व सुलभ प्रवास शक्य होणार आहे. दाटीवाटीच्या नागरी परिसरातून मेट्रोसाठी उन्नत व भूमिगत मार्गाची रचना केल्यामुळे विमानतळ परिसरात मेट्रो बांधकामासाठी कमी जागा व्यापली जाणार आहे.

# ठाणेकरांनो, पाणी जपून वापरा, पाण्याचा अपव्यय टाळून पाणी बचत करा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१७, ठाणे :** सध्या तीव्र उन्हाळा असल्याने धरणातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होत आहे. तसेच विहिरी व कूपनलिकांच्या पाण्याच्या पातळीत मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे. पावसाळा सुरू होईपर्यंत तीव्र पाणी टंचाई निर्माण होऊ नये यासाठी नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करुन पिण्याच्या पाण्याचा वापर गाड्या धुणे, व नळ सुरू ठेवून काम करणे टाळावे व पाण्याची बचत करावी असे आवाहन ठाणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

शक्यतो गाड्या धुवू नयेत त्या ऐवजी बोअरवेलच्या पाण्याने ओल्या कपड्याने गाड्या पुसाव्यात. अंगणात शक्यतो पाणी मारु नये, नळ सुरू ठेवून कपडे धुणे, भांडी घासणे, दाढी करणे टाळावे. घरातील नळांची गळती दुरुस्त करावी. तसेच सोसायटीतील गळकी टाकी, पाईप, व्हॉल्व्ह दुरुस्त करावेत. इमारतीच्या छतावरील टाकी ओव्हरफ्लो होणार याची दक्षता घ्यावी, अन्यथा याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास अथवा तसे आढळून आल्यास संबंधीत इमारतीचे / सोसायटीचे नळ कनेक्शन खंडीत करण्यात येईल. शक्यतो रोज आंघोळीसाठी शॉवर व बाथटबचा वापर करु नये.



स्वच्छतागृहांमध्ये डुअल फ्लशचा वापर करावा. इमारतीतील जिने धुण्यासाठी पिण्याचे पाणी वापरु नये. पाण्याचा अनावश्यक साठा करु नये व साठा केलेले पाणी रोज सकाळी ओतून देण्याची सवय बंद करावी. इमारती/सोसायटी/संकुलांमधील तरण तलावास पिण्याचे पाणी वापरु नये व वारंवार पाणी बदलण्यात येऊ नये. शक्यतो आठवड्यातील पाच दिवस धुण्यायोग्य सगळे कपडे एकत्र करुन एकाच दिवशी धुवावेत. इतर दिवशी गरज पडल्यास दररोज लागणारे छोटे कपडे हाताने कमी पाण्यात धुवावेत. कपडे धुण्याचे मशीन आठवड्यातून एकदा किंवा अगदी आवश्यक असेल तेव्हा दोनदाच आणि ते पूर्ण क्षमतेने वापरावे असे केल्यास पाण्याची बचत व मशीनचा पुर्ण क्षमतेने वापर होण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे कपडे धुण्याचे मशीन किंवा हाताने कपडे धुवून निर्माण होणारे निरुपयोगी पाणी साठवण करुन पुढचे दोन दिवस फ्लश, बाथरुम धुणे, फरशी पुसणे, गाड्या धुणे व बगीचा आदीसाठी वापरावे. 'पाणी अनमोल आहे, पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवा, पाणी वाचवा, पाण्याचा अपव्यय / नासाडी टाळा' असे आवाहन ठाणे महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# श्री स्वामी समर्थ महाराज देवस्थान माळकुप येथे २२ वा वर्धापन दिन

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि,१७, सुपा (अहिल्यानगर) :** गुरुवार दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी महाआरती व महाप्रसाद कार्यक्रमाला जोड लाभली आहे ती म्हणजे श्री स्वामी समर्थ महाराज देवस्थान माळकुप या मंदिराच्या वर्धापन दिनाची होय. १७ एप्रिल २००३ साली स्वामीभक्त किरण पंडित अहमदनगर यांच्या निमित्ताने श्री स्वामी समर्थ महाराज आपल्या म ळकुपच्या माळरानावर आले. आज या गोष्टीला २२ वर्ष पूर्ण होत आहेत. श्री क्षेत्र अक्कलकोट येथे अनुग्रह घेऊन बबन शिंदे गुरुजी यांनी येथे भूदान केल्यानंतर माळकुप येथे गाभारा बांधला व १७ एप्रिल २००३ रोजी भव्य प्रतिष्ठापना सोहळ्यात श्री स्वामी समर्थ महाराज म ूर्ती व पादुका स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

याचवेळी कालिका माता, गणपती, शिवपिंडी स्थापना झाली आहे. या कार्यक्रमास हजारो भाविक भक्ताच्या उपस्थितीत विविध धार्मिक कार्यक्रम दोन दिवस सुरू होते. तेव्हा माळरानावर



काही नव्हते. वीज, पाणी, वृक्षारोपण केले. आई व आप्पा तीन वर्षांनी येथे मुक्कामी सेवेकरी म्हणून राहिले व अखंड श्री स्वामी समर्थ महाराज सेवा तेव्हा पासून सुरू आहे. तेव्हा पासून श्री दत्त जयंती, श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन हे कार्यक्रम संपन्न होत आहेत. पहिल्या दिवसापासून प्रत्येक कार्यक्रमात अन्नदान सेवा महत्त्वाची ठरली आहे. आज मंदिराचे देवस्थान झाले आहे, जिर्णोद्धार करून कायापालट झाला आहे. हे आनंद क्षण आज आपणास अनुभवायला मिळत आहेत ते निमि त्त होऊन श्री स्वामींना माळकुपला आणणारे किरण पंडित व बबन शिंदे गुरुजी यांचे समस्त ग्रामस्थ माळकुप व परिसरातील सर्व स्वामीभक्त यांच्या वतीने मनापासून आभार व धन्यवाद.

# थकीत करावरील व्याज माफिसाठी कॉंग्रेस आक्रमक ; चोवीस टक्के व्याजदर माफ करण्याची मागणी

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१७, मुखेड (नांदेड) :** नगरपरिषदेने सर्वसामान्य नागरिकांच्या थकीत करावर २४ टक्के व्याज दर आकारले आहे. शासनस्तरावर व्याज माफिसाठी योजना राबवली असून व्याज माफ करण्याच्या मागणीसाठी कॉंग्रेस ने आक्रमक भुमिका घेतली आहे. या विरोधात नगरपरिषदेस लेखी निवेदन देण्यात आले असून जन आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

शासनस्तरावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत दि ९ जानेवारी रोजी नगरविकास विभागातर्गत शंभर दिवसाच्या नियोजन आराखडा संदर्भात बैठक घेण्यात आली होती या बैठकीत नगरपरिषद क्षेत्रातील थकीत मालमत्ता करावरील जास्तीचा अंशत: माफ करण्याचे आदेश निर्देशीत केले होते. यासाठी अभय विशेष योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या माध्यमांतून सर्वसाम ान्य गोरगरीब यांच्या थकीत करावर लागू करण्यात आलेले चोवीस टक्के व्याज माफ होणे अनिवार्य होते. परंतु नगरपरिषदेने या बाबत कोणताही ठोस निर्णय घेतला नसून नागरिकांना वेठीस धरले जात आहे.

**नगरपरिषदेस शिष्टमंडळाचे लेखी निवेदन**




या विरोधात आता कॉंग्रेस ने आक्रमक भुमिका घेतली आहे. या संदर्भात कॉंग्रेस कमेटी चे शहराध्यक्ष कैलास गोडसे, माजी नगराध्यक्ष राजबहादूर कोत्तावार, माजी उपनगराध्यक्ष करीम खां साब, कॉंग्रेस जिल्हा सचिव गिरीश कोत्तावार, जिल्हा उपाध्यक्ष राजू चौदंते, कार्याध्यक्ष मोहम्मद गौस, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष तोफीक पठाण,युवक कॉंग्रेस शहराध्यक्ष मुजीब पठाण यांच्या नेतृत्वाखाली शिष्ट मंडळाने नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक मोहंमद अजिमोद्दीन यांना लेखी निवेदन देऊन करावरील व्याज त्वरित रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.

अन्यथा या विरोधात जनआंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी अनुसूचित जाती शहराध्यक्ष ऋषिकेश चौदंते, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष इक्बाल कुरेशी, युवक कॉंग्रेस सचिव अतिक अहेमद, आकाश सोनटक्के, युवक कॉंग्रेस उपाध्यक्ष अविनाश चौदंते, शिवाजी पाटील सूर्यवंशी, सुभाष चौदंते, वेदांत शेवटे, लतीफ टेलर, मल्लेवार यांच्यासह असंख्य कार्यकर्ते होते.

# मान्सूनपूर्व नाले स्वच्छता मोहिमेस सुरुवात

## तत्पुर्वी नाल्यावरील अतिक्रमणांवर कारवाईची मनपाची विशेष मोहीम

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, चंद्रपूर :** शहरातील तिन्ही झोन अंतर्गत येणाऱ्या ६ मोठे नालेसफाई स्वच्छतेचे कार्य युध्दपातळीवर हाती घेऊन १० छोट्या नाल्यांचीही स्वच्छता जुन महिन्यापर्यंत करण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक विपिन पालीवाल यांनी दिले आहेत. मंगळवार १५ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत आयुक्तांनी मान्सूनपूर्व नाले स्वच्छता कामाचा आढावा घेतांना नाले स्वच्छता मोहिमेआधी नाल्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याचेही निर्देश त्यांनी दिले आहे.




नाल्यावर अतिक्रमण केल्याने पाण्याच्या प्रवाहाला अवरोध निर्माण होऊन पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होऊ शकते, याशिवाय पावसाळ्यात नाला ओव्हरफ्लो झाल्यास परिसरात पाणी शिरुन साधन संपत्ती व आरोग्यालाही धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे ज्या नागरिक, दुकानदारांनी नाल्यावर अतिक्रमण करुन बांधकाम केले आहे, त्यांनी ते त्वरीत काढण्याचे आवाहन मनपातर्फे करण्यात येत आहे. नाल्यावरील अतिक्रमण हे पाणी तुंबण्याचे कारण ठरु शकत असल्याचे लक्षात घेता मनपातर्फे नाल्यावरील अतिक्रमणाचा सर्व्हे करण्यात आला होता. यात गडर लाईन कव्हर करणे, पक्के बांधकाम करणे, व्हरांडा बांधण्यासारखे अतिक्रमण केलेले आढळून आले होते. . या सर्व अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्याची विशेष मोहीम आता राबविण्यात येणार आहे. शहरातील तिन्ही झोनअंतर्गत बहुतांश नाल्यांमध्ये गाळ आणि कचरा जमा झाला आहे. यामुळे नाल्याच्या परिसरात राहणार नागरिकांना धोका निर्माण होतो. मुसळधार पावसामुळे पूरपरिस्थितीही निर्माण होण्याची शक्यता असते. हे सर्व टाळण्यासाठी मान्सूनपूर्व नाले स्वच्छता करण्याच्या कामाला सुरुवात करण्यात येत आहे.

शहरातील महाविदर्भ वृत्तपत्र कार्यालय ते मच्छीनाला, सावरकर नगर, बगडखिडकी रेल्वेपटरी, बिनबा मोरी ते सटवाई, रहमतनगर, सिस्टर कॉलोनी, चांबारकुंडी, आकाशवाणी, निंबाळकर वाडी, एस. पी. कॉलेज ते नगराळे दवाखाना, इत्यादी मोठ्या नाल्यांची साफसफाई सुरु असून मनुष्यबळ व जेसीबी च्या मदतीने तेथील गाळ आणि कचरा बाहेर काढण्यात येत आहे. नाल्याभोवती वाढलेली झाडेझुडपी व नाल्यातील माती दगड बाहेर काढून सांडपाण्याला वाट काढून दिली जाणार आहे. त्यामुळे सांडपाणी तुंबून न राहता पुढे वाहून जाईल. सांडपाण्याला वेग आल्याने नाल्याजवळील दुर्गंधी कमी व्हायला मदत होईल. नाले सफाईचे कार्य मशीनद्वारे आणि जेथे मशीनद्वारे शक्य नाही तेथे स्वच्छता कर्मचाऱ्यांतर्फे होणार आहे.

सध्या स्वच्छतेच्या कामात नियमित ३१५ सफाई कर्मचारी व अतिरिक्त १३० असे एकूण ४४५ कर्मचारी कार्यरत असणार आहेत. याशिवाय मोठ्या नाल्यांच्या सफाईकरीता ५ जेसीबी लावण्यात आल्या असून लवकरच पोकलेनद्वारे स्वच्छता सुरु करण्यात येणार आहे. अन्य नाले जेथे पोकलेन जाऊ शकत नाही अशा उर्वरीत नाल्यांची स्वच्छता मनुष्यबळाद्वारे करण्यात येत आहे. यापूर्वी मे महिन्यात सुरु होणारी नाला सफाई यावर्षी एप्रिल महिन्यातच सुरु करण्यात आली आहे. विविध विभागांच्या समन्वयातून स्वच्छता विभाग हे उद्दिष्ट साध्य करणार आहे.

# मेफोड्रोन (एम.डी.) अंमली पदार्थ सराई इराणी आरोपीताकडून पोलिसांनी केला हस्तगत

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१७, कल्याण (ठाणे) :** पोलीस उपायुक्त परिमंडल ०३ मधील खडकपाडा पोलीस स्टेशन गु.र.नं. ३२१/२०२५, अंमली पदार्थ विरोधी कायदा १९८५ चे कलम ८ (क), २० (ब) प्रमाणे पोलीस उपायुक्त परि. ०३, कल्याण यांचे विशेष कारवाईचे पथकाचे अधिकारी व अंमलदार तसेच खडकपाडा पोलीस ठाणेतील पोलीस निरीक्षक गुन्हे व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अंमलदार असे पोलीस उपायुक्त परि. ०३, कल्याण यांचे आदेशानुसार खडकपाडा पोलीस ठाणे अंतर्गत अटाळी परिसरात बेकायदेशीर अंमली पदार्थ विकी करणारे पेडलर व अभिलेखावरील




फरार आरोपीचा शोध घेवून त्यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करणे करीता खाजगी वाहनांवरून प्रतिबंध गस्त करण्या करीता रवाना झाले.

सदरचे पथक दिनांक १६/०४/२०२५ रोजी १८.१५ वा. चे सुमारास बंदरपाडा कडून शिवमंदिरकडे जाणाऱ्या कच्या गावठाण रोडवर, बंदरपाडा, कल्याण प. जि. ठाणे या ठिकाणी आले असता सदर ठिकाणी पोलीस पथकास रोडचे कडेला उभ्या असलेल्या एका काळया रंगाची सुझुकी कंपनीची ऍक्सेस स्कुटी क्रमांक एम.एच. ०४ के.जे. ८८६४ स्कुटीवरील इसमाच्या हालचाली संशयीत बाटल्या पाहून पोलीस पथकाने त्याचा पंचासमक्ष अंगझडती पंचनामा करण्यात आला असता

त्याचे ताब्यातुन १) १५ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एम. डी.), अंमली पदार्थ. अं.कि.रु. ३०,०००/- हा अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आल्या असुन सदर इसम नामे हाशमी जाफर हुसैन जाफरी, वय ३३ वर्षे, रा. ठि. ५४, जाणु पाटील चाळ, इराणी नगर, आआंबिवली रेल्वे स्टेशग जवळ, अटाळी, ता. कल्याण, जि. ठाणे यास खडकपाडा पोलीस ठाणे येथे अटक करण्यात आली व पुढील तपास चालु पोलीस करत आहे.

# जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज पादुका दर्शन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.१७, उदगीर (लातूर) :** जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांचा पादुका दर्शन सोहळा गुरुवार दि १७ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला यावेळी जवळपास २० ते २५ हजार पेक्षा जास्त भाविक भक्तांनी कार्यक्रमाचा लाभ घेतला.

सकाळी ९ ते ११:३० शोभायात्रा काढण्यात आली या शोभायात्रेत रथामधे जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या सिध्द पादुका व प्रतीमेच्या समोर कलश धारी महीला, विविध फलक, ध्वजधारी पुरुष - महिला व भजनी मंडळ सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान च्या वतीने सामाजिक उपक्रमा अंतर्गत २५ गरजु महिलांना शिलाई मशीन चे वाटप मा.मंत्री आमदार संजय बनसोडे, मा. आमदार गोविंद अण्णा केंद्रे, बस्वराज बागबंदे नगर अध्यक्ष उदगीर, भारत चामले प्रदेश संघटक राष्ट्रवादी कॉंग्रेस, डॉ रविराज जाधव कार्यक्रमाचे जागा मालक, चंद्रकांत मुचळंबे उद्योजक, नगर सेवक सुधाकर पाटील, मनोजदादा पुदाले, सुधीर भोसले, स्नेहा मोटे राष्ट्रवादी श प गट जिल्हा महिला अध्यक्ष व आजचे अन्नदाते उद्योजक सुर्यकांत मुचळंबे यांच्या हस्ते करण्यात आले.

१२ ते १:३० वाजता गुरु पुजन व महाआरती करण्यात आली. १:३० ते ३ नाणीज पिठाच्या ज.न.म. प्रवचनकार अकांक्षा पाटील ताई यांचे अमृततुल्य असे प्रवचन संपन्न झाले. या प्रवचनात आध्यात्म, भक्ती, विज्ञान व व्यवहार यावर प्रवचन झाले. यावेळी जवळपास १००० भाविकांनी उपासक दिक्षा घेतली, दुपारी ३ ते ६.३० जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या पादुका दर्शनाचा लाभ भाविकांनी घेतला तसेच सायंकाळी ६:३० वाजता जगद्गुरु श्रींच्या पादुकांवर पुष्पवृष्टी करुन सोहळ्याची सांगता करण्यात आली.

यावेळी सर्व भाविकांसाठी पिण्याचे थंड पाणी व महाप्रसादाची सोय करण्यात आली होती.

या कार्यक्रमास मराठवाडा पिठ व्यवस्थापक शैलेश काळे, दौरा प्रमुख दिलीप सोमदे आप्पा, सहपीठ प्रमुख व लातूर जिल्हा निरीक्षक विजय देशपांडे, मनोहराव सावळे, आजचे अन्नदाते उद्योजक सुर्यकांत मुचळंबे तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या सोहळ्यास स्व-स्वरूप संप्रदाय जिल्हा सेवा समिती लातूर, पादुका दर्शन उत्सव समिती उदगीर, सर्व तालुका सेवा समिती, ज.न.म. प्रवचनकार, हिंदू संग्राम सेना, आजी-माझी पदाधिकारी, शिष्य, साधक व भक्तगण यांनी परिश्रम घेतले.

# धुळ प्रदूषण नियंत्रणासाठी अत्याधुनिक यंत्रणेचा पनवेल मनपाकडून प्रभावी वापर

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, पनवेल :** वाढत्या धुळी प्रदूषणावर नियंत्रण करण्यासाठी पनवेल महानगर पालिकेच्या पर्यावरण विभागाने विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार महापालिका कार्यक्षेत्रातील धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी अत्याधुनिक साधनसामग्रीचा वापराबरोबरच जनजागृती अभियानांचा समावेश आहे.




यात महानगरपालिकेने पालिका कार्यक्षेत्रात ४ फॉग कॅनन वाहने (सूक्ष्म धूळ नियंत्रण करणारी यंत्रे) कार्यरत केली असून, या वाहनांद्वारे चारही प्रभागामध्ये दररोज धूळ प्रदूषण नियंत्रणाच्या दृष्टीने सूक्ष्मरित्या पाण्याची फवारणी करण्यात येत आहे. याबरोबरच पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील हवेतील प्रदूषणाची गुणवत्ता निरीक्षण करणेसाठी मोबाईल एअर क्वालिटी मॉनिटरींग व्हॅन कार्यरत आहे. या गाडीच्यामार्फत पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये दैनंदिन हवा प्रदूषण गुणवत्ता पातळी तपासली जात आहे.

उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशानुसार पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बेकरी युनिट्सना लाकूड व कोळशाचा वापर थांबवून सीएनजी गॅस किंवा विद्युत तंदूर वापरण्यासाठी रुपांतरीत करण्याबाबत आतापर्यंत १५१ नोटीस जारी करण्यात आल्या आहेत. तसेच उच्च न्यायालय मुंबईच्या आदेशानुसार दि.२८ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रभाग अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रभाग स्तरीय हवा प्रदूषण नियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे. तसेच उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रभाग अधिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली प्रभाग स्तरीय हवा प्रदूषण नियंत्रणासाठी भरारी पथके गठित करण्यात आली आहेत. महत्वाचे म्हणजे पनवेल महानगरपालिकेद्वारे दिपावली सणाच्या अनुषंगाने भारत सरकार, अधिसूचना क्रमांक जी. एसआर. ६८२(ई) दि.५ ऑक्टोंबर १९९९ अन्वये १२५ डीबी (एआय) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांच्या वापराच्या मनाई बाबत प्रसार माध्यमातून नागरिक आणि फटाके विक्री करणारे व्यावसायिक यांना जाहीर आवाहन करण्यात आले आहे.

याबरोबर संपूर्ण पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात धूळ प्रदूषणाविषयी जनजागृती करण्यासाठी आणि विविध मोहिमांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने माहिती, शिक्षण, आणि संवाद वाहन सुरू करण्यात आले आहे. या वाहनामार्फत पर्यावरण विषयक माहिती, माझी वसुधंरा अभियान, प्लॉस्टिक बंदी जनजागृती, प्रदूषण नियंत्रण विषयक विविध मोहिमा, पर्यावरण पूरक सण-उत्सव शासनाचे पर्यावरण विषयक विविध उपक्रम याबाबतची माहिती प्रसारित करून नागरिकांमध्ये जनजागृती केली जाते आहे.

# थोडक्यात

## पोर्णिमा चौक बनला डोकेदुखीचा विषय...

## बस चालक व वाहनचालक त्रस्त



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१७, कल्याण (ठाणे) :** कल्याण पश्चिम मुरबाड रोड वरील पोर्णिमा चौक हे ठिकाण सध्या बस चालकांसाठी डोकेदुखीचं कारण ठरतं आहे. रस्त्याच्या मधोमध उभे करण्यात आलेले अवाढव्य दगडी डिव्हायडर, एकीकडे अनधिकृत फळविक्रेते, तर दुसऱ्या बाजूस हातगाड्यांचा विळखा – या सर्वांमुळे वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण होत आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे या परिसरात अनधिकृत व्यवसाय फोफावले असून, प्रशासनाच्या कारवाईचा कुठेच अडसर दिसून येत नाही. रस्ते म्हणजे काहींच्या वैयक्तिक मालकीची जागा असल्यागत बिनधास्तपणे सुरू असलेल्या या व्यवसायांमुळे शासकीय बस चालकांनाच नव्हे, तर सामान्य वाहनचालकांनाही नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

रोजच या चौकात वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. बस अडकते, वेळ वाया जातो, आणि वाहनचालक व बसचालकांमध्ये वाद-विवाद, भांडणे होतात. प्रवाशांच्या गैरसोयीबाबत मात्र कोणताही ठोस उपाय किंवा नियोजन अद्यापही करण्यात आलेले नाही.

या सगळ्या परिस्थितीत 'या अनधिकृत गाड्यांवर कोणाचा वरदहस्त आहे?' हा प्रश्न उपस्थित होतो. प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन कठोर कारवाई केली नाही, तर हा चौक वाहतुकीसाठी आणखी धोकादायक ठरू शकतो.

स्थानिक प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने पाहून लवकरात लवकर योग्य उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

## नांदेड मध्ये पाणीपुरी खाल्याने ३१ विद्यार्थ्यांना विषबाधा



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१७, नांदेड :** विष्णुपुरी येथील काळेश्वर मंदिर रस्त्यावर असलेल्या एका दुकानातून पाणीपुरी खाल्ल्याने ३१ विद्यार्थ्यांना विषबाधा झाली असुन त्यांच्यावर नांदेडच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत यातील काही जणांची प्रकृती सुधारलेल्या विद्यार्थ्यांना घरी पाठवण्यात आले

बुधवारी संध्याकाळी परिसरातील काही मुलांनी पाणीपुरी खाल्ल्यामुळे दि.१७ रोजी गुरुवारी पहाटे चार ते सहाच्या दरम्यान त्यांना मळमळ उलटी पोटदुखी ही लक्षणे जाणवल्याने उपचाराकरिता डॉ शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालय अपघात विभागात एकूण ३१ रुग्ण दाखल केले आहेत

विष्णुपुरी परिसरात अनेक शैक्षणिक संकुले आहेत यामुळे येथे हजारो विद्यार्थ्यांची रेलचेल आहे बुधवारी रात्री स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ग्रामीण तंत्रनिकेतन व एसजीजीएस महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विष्णुपुरी येथील काळेश्वर मंदिर रस्त्यावर असलेल्या रतन चाटी यांच्या भैरवनाथ पाणीपुरी सेंटर येथे पाणीपुरी खाली होती यातील ३१ विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याने मध्यरात्रीपासून उलटी मळमळ आणि चक्कर असा त्रास सुरू झाला गुरुवारी सकाळी या विद्यार्थ्यांना विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सदर विद्यार्थ्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली असून डॉक्टर त्यांच्यावर उपचार करीत आहेत.

## मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) कारखान्याकडून ऊस बिलाची रक्कम जमा



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१७, धाराशिव :** तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) कारखान्याच्या वतीने सन २०२४-२५ मध्ये गाळप केलेल्या ऊस बिलाची रक्कम १०० रूपयांप्रमाणे शेतकजयांच्या बँक खात्यावर जमा केली आहे. महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी तथा मांजरा शुगर इंडस्ट्रीजचे मार्गदर्शक दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) कारखाना यशस्वीपणे वाटचाल करीत आहे. गाळप हंगाम २०२४- २५ मध्ये कारखान्याचे २ लाख ५० हजार ५३७ मे. टन ऊसाचे गाळप करुन २ लाख ८० हजार ८५५ क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे. सरासरी साखर उतारा ११.२१ टक्के प्राप्त झाला आहे. कारखान्याने गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये गाळपास आलेल्या ऊसासाठी यापूर्वी प्रति मे. टन २७०० रूपये दर अदा केलेला आहे. तसेच यापुढे जावून कारखाना व्यवस्थापनाने सदर हंगामात गाळपास आलेल्या ऊसाला प्रति मे. टन १०० रूपयांप्रमाणे वाढीव ऊस दर देण्याचा निर्णय घेतला आहे. वाढीव ऊस बिलाची रक्कम १७ एप्रिल रोजी संबंधीत ऊस पुरवठादार शेतकरी यांचे बँक खातेवर जमा केल्याची माहिती कारखान्याचे जनरल मॅनेजर सतीश वाकडे यांनी दिली आहे. गतवर्षी या भागामध्ये अत्यंत कमी पर्जन्यमान झाल्यामुळे दुष्काळ सदृष्य स्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे कारखान्याला ऊसाअभावी आपला गाळप हंगाम आटोपता घ्यावा लागला. अशा प्रतिकुल परिस्थितीमध्येही कारखान्याचे संस्थापक सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी वाढीव ऊस दर प्रति मे. टन १०० रूपयांप्रमाणे भाव देण्याचे कारखाना प्रशासनाला आदेश दिले. त्यामुळे कारखाना प्रशासनाने सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून ७५ व्या वाढदिवसानिमित्त १७ एप्रिल रोजी गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये गाळपास आलेल्या ऊसाला वाढीव भाव प्रति मे. टन १०० रूपये प्रमाणे ऊस बिलाचे पेमेंट संबंधीत ऊस पुरवठादार शेतकजयांच्या बँक खात्यात वर्ग केले आहे. यामधुन सहकार महर्षी मा. दिलीपराव देशमुख यांचा या भागातील शेतकजयांप्रती असलेला जिव्हाळा दिसून येतो. शेतकजयांच्या जिवनामध्ये आर्थिक क्रांती आणून त्यांचे जिवनमान समृध्द करण्याचा एकमेव हेतू यातून दिसून येतो.